University of Mumbai

Phone -022 – 2270 3248
E-mail - dy.registrar.aau@gmail.com

Thesis Department,
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road,
Mumbai – 400 032

Ref. No.: Th. / ICD /2017-18 / 389

Date : 06/ 09 / 2017

# परिपत्रक

## विषय : शैक्षणिक वर्ष २०१८–१९ या वर्षासाठी संशोधन संस्थेच्या मान्यतेचे अर्ज.

मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील संशोधन केंद्राचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संशोधन संस्थांचे संचालक / आणि संशोधन विभाग तसेच, विद्यापीठ विभागांचे विभागप्रमुख यांना असे कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील संशोधन केंद्रासाठी प्रथम मान्यता (First Time Recognition)/ सलग मान्यता (Continuation of Recognition) / विस्तारिकरणांतर्गत अस्तित्वात असणा–या विद्याशाखेच्या नविन अभ्यासक्रमांची मान्यता (Extension of Recognition for New Course under same Faculty) / विस्तारिकरणांतर्गत वेगळया विद्याशाखेच्या नविन अभ्यासक्रमांची मान्यता (Extension of Recognition for New Course under different Faculty)/ अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ किंवा घट (Increase or Decrease in intake capacity) तसेच कायम मान्यता (Permanent Recognition) इत्यादी बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या ***सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १११*** च्या तरतुदींनूसार इच्छुक संस्थांनी खालील वेळापत्रकानूसार आपले अर्ज / प्रस्ताव सादर करावे.

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ या वर्षासाठी मान्यतेबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे :

| प्रक्रिया | कालबध्द कार्यक्रम |
|---|---|
| विविध महाविद्यालये / शैक्षणिक / संशोधन संस्था आपले विहीत नमुन्यातील अर्ज कुलसचिव कार्यालयास सादर करतील. | **दि. ३० सप्टेंबर, २०१७** |
| प्राप्त अर्जाची विद्यापीठाद्वारे छानननी. | ऑक्टोबर, २०१७ |
| स्थानिक चौकशी समितीची भेट व त्रुटी असल्यास संबंधितांना कळवणे व त्यांची त्रुटी पुर्तता करुन घेणे. | नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ |
| विद्यापीठाच्या विविध प्रांधिकरणांची मान्यता घेणे. | जानेवारी, २०१८ |
| मान्यतेबाबतचा अंतिम निर्णय संबंधित संस्थांना कळविणे. | फेब्रुवारी, २०१८ |

कृपया, मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक क्र. संलग्नता / आय.सी.ई. / २०१६–१७ /१४ पहावे. सदर परिपत्रकाद्वारे महाविद्यालयाचे संलग्निकीकरण करण्याची प्रक्रिया संगणकाद्वारे करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषगांने, महाविद्यालयांमधील संशोधन केंद्रे व संशोधन संस्था यांचेही मान्यतेचे ( Recogniation of Reserch Centre ) काम संगणकीकरणाद्वारे करावयाचे प्रस्तावित आहे. ज्या महाविद्यालयांनी / संस्थांनी अद्याप पर्यन्त ऑनलाईन नोंदणी केली नाही, अशा सर्व संशोधन केंद्रे व संशोधन संस्था यांनी ऑनलाईन नोंदणी करुन Login ID व Passward प्राप्त करुन घेणे आवश्यक असेल. ऑनलाईन नोंदणी Login ID व Passward प्राप्त करुन घेण्यासाठी खालील सुचनांचे पालन करावे.

१. प्रथम www.muonline.org.in या संकेतस्थळाला भेट द्यावी व होमपेज वरिल Get Login for Research Institutue या लिंक वर जावे.

२. आपल्या संस्थेचे नांव, प्राचार्य / संचालकाचे नांव व मोबाईल क्र. नमूद करावा.

# University of Mumbai

Phone -022 – 2270 3248
E-mail - *dy.registrar.aau@gmail.com*

**Thesis Department,**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road,
Mumbai – 400 032



३. संशोधन संस्था मान्यतेचे ( Latest Recognition Letter ) शेवटचे / अलिकडचे पत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी. जर एकापेक्षा जास्त विषयांना मान्यता मिळालेली असेल, तर प्रत्येक विषयाबाबतचे मान्यतेचे पत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी.

४. आपण सादर केलेल्या मोबाईल क्रमांकावर Passward SMS द्वारे आपणांस कळविण्यात येईल.

५. तदनंतर, सदर Login ID व Passward वापरुन ऑनलाईन Ph.D. या बटनावर क्लिक करुन आपणांस आवश्यक असलेला पर्याय निवडावा.

६. आपल्या संस्थेद्वारे अदा करावयाच्या शुल्क रकमेचा तपशिल आपणांस दिसेल. सदर रकमेचा भरणा ऑनलाईन प्रक्रियेद्वारे करावयाचा आहे.

७. संगणकावर येणा–या सुचनांप्रमाणे अर्ज संपुर्णपणे भरावा. एखादी बाब लागू नसल्यास Not Applicable असे लिहावे परंतू, कुठलाही रकाना रिकामा ठेवू नये किंवा ''—'' लिहू नये.

८. अर्जासोबत जोडावयाचे सर्व दस्ताऐवजांची PDF प्रत अपलोड करावी.

९. संपूर्ण अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर Sent to University या लिंक वर क्लिक करुन अर्ज विद्यापीठास सादर करावा व संपूर्ण अर्जाच्या प्रतीची Printout घ्यावी व अशा ४ प्रती तयार कराव्यात.

१०. उपरोक्तपैकी अर्जाची एक प्रत ( संपूर्ण दस्तऐवजांसह ) पुढील दहा दिवसांच्या आत विद्यापीठास सादर करावी. सदर प्रत प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक असेल. टपालाद्वारे अर्जाची प्रत स्विकारली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

११. उर्वरित ३ अर्जांच्या प्रती स्थानिक चौकशी समितीच्या सदस्यांना त्यांच्या भेटीच्या वेळी हस्तांतरीत कराव्यात.

१२. ऑनलाईन प्रक्रियेत यशस्वीरित्या सादर करण्यात आलेले अर्जच पुढील मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ग्राहय धरले जातील. **ऑफलाईन अर्ज व अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेनंतर म्हणजेच दि. ३० सप्टेंबर, २०१७ नंतर कोणताही अर्ज स्विकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

( दत्ता धुगे )
उपकुलसचिव, विद्याविषयक प्राधिकरणे व प्रबंध विभाग

मुंबई – ४०० ०३२
०६ सप्टेंबर, २०१७

प्रत:

१. मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील संशोधन केंद्राचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संशोधन संस्थांचे संचालक / आणि संशोधन विभाग तसेच, विद्यापीठ विभागांचे विभागप्रमुख.